**प्रकल्प प्रवर्तक मे. जे. एस. डब्ल्यू. स्टील लिमिटेड, डोलवी, तालुका-पेण, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित एकात्मिक स्टील प्रकल्प क्षमता १०.० दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन १५.० दशलक्ष टन प्रतिवर्ष विस्तारीकरण (५.० दशलक्ष टन प्रतिवर्ष विस्तार) संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी बाबतचे इतिवृत्त –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. जे. एस. डब्ल्यू. स्टील लिमिटेड, डोलवी, तालुका-पेण, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित एकात्मिक स्टील प्रकल्प क्षमता १०.० दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन १५.० दशलक्ष टन प्रतिवर्ष विस्तारीकरण (५.० दशलक्ष टन प्रतिवर्ष विस्तार) करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी ०२.३० वाजता मे. जे. एस. डब्ल्यू. जेट्टी वाहनतळ, धरमतर पोलिस तपासणी नाका, वावे (वडखळ), तालुका-पेण, जिल्हा-रायगड – ४०२ १०७, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

सौ. ऋतुजा भालेराव, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ तथा आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी समिती; श्री संजय भोसले, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती; स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे, मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड कार्यालय

यांच्यातर्फे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जन सुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व तदनंतर वेळोवेळी अधिसूचित केलेल्या सुधारणाअन्वये, विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक पूर्व अनुमती (prior Environmental Clearance) घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजिका यांनी स्पष्ट केले की, पर्यावरणीय समस्यांवरील सार्वजनिक सुनावणीचे प्राथमिक उद्दिष्ट प्रकल्प हे प्रकल्पबाधित क्षेत्रातील रहिवाशांना येणारा प्रकल्प आणि त्याच्या संभाव्य पर्यावरणविषयक परिणामांबद्दल माहिती देणे, योजलेल्या प्रदूषण नियंत्रण उपायांबद्दल माहिती सामायिक करणे आणि त्यांच्या सूचना आणि अभिप्राय गोळा करणे हा आहे.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. जे. एस. डब्ल्यू. स्टील लिमिटेड, डोलवी, तालुका-पेण, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांचा त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित एकात्मिक स्टील प्रकल्प क्षमता १०.० दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन १५.० दशलक्ष टन प्रतिवर्ष विस्तारीकरण (५.० दशलक्ष टन प्रतिवर्ष विस्तार) करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक ०१.०७.२०२५ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग "अ अनु.क्रं. ३ (ए) – मेटेरोलॉजिकल इंडस्ट्रीज (फेरस आणि नॉन-फेरस), अनु.क्रं. १ (डी) -थर्मल पॉवर प्रकल्प, अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल

मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची पुर्व "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ३०.१०.२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक १६.०७.२०२४ रोजी प्रदान केली. प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ३०.१०.२०२३ रोजी सादर केला व त्या अर्जास भारत सरकारने प्राथमिक मान्यता (ToR) मंजूरी दिनांक १६.०७.२०२४ रोजी प्रदान केली. सदरील TOR मध्ये राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पर्यावरणविषयक जन सुनावणी घेण्यात यावी असे सूचित केले आहे.

तसेच, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट (NABET) मंजुरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार **मेकॉन इंडिया लिमिटेड (भारत सरकार यांचा उपक्रम)** यांची नियुक्ती करून त्यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ०१ ऑक्टोबर, २०२२ ते ३१ डिसेंबर, २०२२ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो मंडळास जन सुनावणीसाठी सादर करण्यात आला.

सह संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक No. / MPCB / JD(WPC) / ENV-PH / B-250707-FTS-0097 दिनांक ०७.०७.२०२५ अन्वये उप-प्रादेशिक कार्यालय, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,

सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांना सदरील प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

तदनंतर, उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांनी दिनांक १५.०७.२०२५ रोजीच्या पत्राअन्वये मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी प्रक्रिया सुरू करण्यास अनुमति देण्याबाबत विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांनी त्यांच्या दिनांक १८.०७.२०२५ रोजीच्या पत्रानुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जन सुनावणी शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी ०२.३० वाजता मे. जे. एस. डब्ल्यू. जेट्टी वाहनतळ, धरमतर पोलिस तपासणी नाका, वावे (वडखळ), तालुका-पेण, जिल्हा-रायगड – ४०२ १०७, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५५ / २०२५, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२५०७२८-एफटीएस-००८५, दिनांक २८.०७.२०२५ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४.०९.२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जन सुनावणी समिती गठित केली:-

१) मा. जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी – - **सदस्य**

प्रादेशिक अधिकारी - रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई – ४०० ६१४

३) उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-२, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई – ४०० ६१४

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांनी जन सुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र "दैनिक कृषिवल" आणि "दैनिक रायगड टाईम्स" यामध्ये मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र "इंडियन एक्सप्रेस" यात इंग्रजीत दिनांक २२ जुलै, २०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जन सुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचे सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील शासकीय कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड, अलिबाग,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,

५) उप विभागीय अधिकारी, पेण, तालुका-पेण जिल्हा –रायगड,

६) उप विभागीय अधिकारी,अलिबाग, तालुका-अलिबाग, जिल्हा –रायगड,

७) पोलिस अधिक्षक, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड,

८) तहसीलदार, तहसील कार्यालय,पेण, तालुका-पेण, जिल्हा- रायगड,

९) तहसीलदार, तहसील कार्यालय,अलिबाग, तालुका-अलिबाग, जिल्हा- रायगड,

१०) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,पेण, तालुका-पेण, जिल्हा-रायगड,

११) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, अलिबाग, तालुका-अलिबाग, जिल्हा- रायगड,

१२) **तालुका-पेण:-** ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालये- डोलवी, काराव, वडखळ, बोरी, खारपाले,कासू, निगडे, आमटेम, कोलेटी, कासू, शिर्कि, मसद, कांदळे, उंबडे, कोप्रोली, मळेघर, वाशी, वढाव, काळेश्री, बोरजे, कणे, रोडे, पाटणेश्वर, तरणखोप, दिव, तालुका-पेण, जिल्हा-रायगड,

१३) **तालुका-अलिबाग:-**ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालये-शहाबाज, पोयनाड, आंबेपूर, पेझारी, शहापूर, श्रीगाव, कुसुंबळे, कुर्डूस, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड,

१४) मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

१५) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१६) प्रादेशिक अधिकारी, रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४,

१७) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४,

१८) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांना ८१२१ सूचना/ आक्षेप विविध सूचित कार्यालयाकडून/प्रत्यक्ष/ई-मेलद्वारे/पोस्टाने/जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांच्याकडून प्राप्त झालेले आहेत.

आयोजिका यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजिका यांनी प्रतिपादन केले की, ही पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्पास मान्यता देणे/संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जन सुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची जन सुनावणीच्या इतिवृत्तात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे

सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, छायाचित्रे, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांच्या संमतीने, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर केंद्रीय मंत्रालय येथील तज्ज्ञ समिती पर्यावरणीय मंजुरीबाबत पुढील निर्णय घेतील.

त्यानंतर आयोजिका यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याची विनंती केली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की राष्ट्रीय पोलाद धोरणांतर्गत पोलाद मंत्रालयाने २०३० पर्यंत ३००.० दशलक्ष टन पोलाद उत्पादनांची गरज असल्याचे प्रतिपादन केलेले आहे. त्यानुसार जेएसडब्लु स्टील लिमिटेड यांनी त्यांच्या डोलवी येथील कार्यरत प्रकल्पात उत्पादन क्षमता विस्तारीकरण योजिलेले आहे.

या विस्तारीकरण प्रकल्पासाठी एकूण पाण्याची आवश्यकता ही १,६४,०५९ किलोलिटर्स प्रतिदिन असेल. त्यासाठी अंबा नदीतून १,२६,२४९ किलोलिटर्स प्रतिदिन एवढा ऊपसा करण्यात येणार असून प्रकल्पातील ३७,८१० किलोलिटर्स पाण्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे.

प्रकल्पात बांधकाम टप्प्यात सुमारे २६८ कायमस्वरुपी तर ६,००० कंत्राटी कामगारांची गरज असून प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ६७८ कायमस्वरुपी तर २,३४४ कंत्राटी कामगारांची आवश्यकता आहे. त्यासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे.

विस्तारीकरण प्रकल्पासाठी खर्च अंदाजे २३,६८८.० कोटी लागणार असून आर्थिक वर्ष २०२६ करिता सीएसआर अंदाजपत्रक २३.७३ कोटी एवढे आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनसाठी खर्च अंदाजे ८३२.९२ कोटी लागणार आहे.

प्रकल्पासाठी चेन्नई येथील नॅशनल फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट (NCSCM) व्दारे सीएसआर सीमांकन करण्यात आलेले आहे.

मागिल पंधरा वर्षात प्रकल्प परिसरातील विविध गावांमध्ये विविध सामाजिक उपक्रमांसाठी सुमारे २७६८८ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (ईएमपी) सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ,पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. प्रश्न विचारताना संबंधितांनी प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे अशी विनंती करण्यात आली.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जन सुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) सौ. शिवानी विश्वास म्हात्रे, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत,वडखळ, तालुका-पेण, जिल्हा-रायगड:-**

जे.एस.डब्ल्यू प्रकल्प हा आमच्या परिसरातील एक संजीवनी आहे. आज मी सरंपच, वडखळ म्हणून जे.एस.डब्ल्यू स्टील प्रकल्प विस्तारीकरणास तसेच जे.एस.डब्ल्यू जेट्टी (फेज-३) विस्तारीकरणास जाहीर पाठिंबा देत आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक युवक व युवतींना रोजगाराच्या नविन संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार आहेत. स्थानिक व्यवसाय, उद्योग यांना चालना मिळणार आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक विकासाची अनेक दारे खुली होणार आहेत. तसेच कौशल्य शाळेतून येथे नर्सिंग कॉलेज, अभियांत्रिकी कॉलेज सोबत स्थानिक युवक-युवतींना रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होईल. त्यामुळे आम्ही सर्व ग्रामस्थ व सर्व ग्रामपंचायतींचे सदस्य या प्रकल्पाचे मन:पुर्वक स्वागत करत आहोत.

जेएसडब्ल्यू समुहाने केवळ उद्योग उभारणी न करता सामाजिक उत्तरदायित्व जपून अनेक लोकोपयोगी कामे हाती घेतलेली आहेत. सीएसआर निधीच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, क्रिडा व पाणीपुरवठा यात लक्षणिय काम करून स्थानिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणलेले आहे.

मी सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत वडखळतर्फे प्रकल्प विस्तारीकरणास मनःपूर्वक पाठिंबा देत आहे. मी लेखी निवेदन सादर करीत आहे.

२) **श्री अनिल परशुराम पाटील, राहणार-पेझारी,पोस्ट-पोयनाड, तालुका-अलिबाग,जिल्हा-रायगडः-**

मी शेतकरी कामगार पक्षाचा जिल्हा चिटणिस आहे. आज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी आयोजित केलेली आहे. जर ही पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ च्या निर्देशांनुसार आयोजित केलेली असेल, तर माझा त्यावर आक्षेप नाही. माझा विकासाला विरोध नाही. प्रकल्पालाही विरोध नाही. पण येथील पर्यावरण संतुलन राहणे

महत्वाचे आहे. आम्ही येथेच राहतो. आम्हांला जगण्यासाठी ज्या काही अडचणी येतात, त्यांचे निराकारण करणे आवश्यक आहे. मी ईमेलव्दारे माझी हरकत नोंदविलेली असून प्रत्यक्षपणे हरकत सादर केलेली आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी फेज-३ चे विस्तारीकरण नियोजित केलेले आहे, त्याचे स्वागतच आहे. परंतु फेज-१ व फेज-२ विकसित करताना व केल्यानंतर ज्या काही पर्यावरणीय समस्या येथे निर्माण झाल्या, त्यांचे निराकरण अजूनपर्यंत झालेले नाही. फेज-१ व फेज-२ मुळे होणा-या प्रदूषणाचा त्रास आम्हांला अजूनही सहन करावा लागत आहे. तर त्या प्रदूषण समस्यांचे प्रथम निराकरण करेपर्यंत फेज-३ चे विस्तारीकरण करु नये अशी माझी विनंती आहे.

दुसरा आक्षेप – जे.एस.डब्ल्यू. प्रकल्पामुळे आमची धरमतर खाडी ही बाधित झालेली असून विस्तारीकरणानंतर त्यात भरच पडेल. आतापर्यत ०९ (नऊ) बार्ज येत आहेत. विस्तारीकरणानंतर १५ (पंधरा) बार्ज येणार आहेत. १५ (पंधरा) बार्जमुळे ज्या लाटा उत्पन्न होतील, त्यामुळे आमची बांध बंधिस्ती (Bunding) तुटेल. आमच्या गावात उच्च भरती पातळीवेळी (High Tide Level- HTL) आमच्या गावाला पुरस्थिती निर्माण होते. आमचे शहापूर गाव हे उच्च भरती पातळीच्या (High Tide Level- HTL) खाली (downside) आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने लक्ष देणे गरजेचे आहे.

तिसरा आक्षेप आहे की या विस्तारीकरणामुळे हवेचे प्रदूषण वाढणार आहे. मी जेथे राहतो, तेथील हवेची गुणवत्ता कशी आहे हे नागरिक म्हणून जाणून घेण्याचा मला पुर्ण अधिकार आहे. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी हवा गुणवत्ता दर्शनी फलक (Display Board) अद्यापपावेतो लावलेला नाही, त्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुढील कारवाई केलेली नाही. येथील हवेचे मुल्यांकन होणे आवश्यक आहे..

चौथा आक्षेप – प्रकल्पात स्टीलवर प्रक्रिया केल्यानंतर जो स्लज तयार होतो, त्यात कुठल्या प्रकारची प्रदूषके असतात, त्याचा जमिनीवर होणारा रासायनिक परिणाम, आणि त्या स्लजची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट याबाबत सर्व शास्त्रीय मुल्यांकन/माहिती आहे का, तर ती देण्यात आलेली नाही. तरी संबंधित माहिती उपलब्ध करण्यात यावी.

पाचवा आक्षेप - माझा पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणीस आक्षेप नाही. मात्र पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार स्थानिक, प्रकल्पबाधित ग्रामपंचायत कार्यालयांना संपूर्ण प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (Draft EIA report) उपलब्ध करणे बंधनकारक असताना संक्षिप्त अहवाल – कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्याचा विस्तृत अभ्यास (Detailed Study) स्थानिकांना करता आलेला नाही. विस्तृत अभ्यास स्थानिकांनी करणे गरजेचे आहे. याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार संबधित अपिलिय अधिकारी (Appellate Authority) यांनी याबाबत आक्षेप घेतल्यास, जन सुनावणी बेकायदेशीर ठरल्यास प्रकल्प प्रवर्तकांना पुन्हा जन सुनावणी आयोजित करावीच लागेल. तरी संक्षिप्त पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाबाबतच्या माझ्या आक्षेपांना उत्तर देण्यात यावे.

सदरहू बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मला प्राप्त व्हावी त्यासाठी लेखी निवेदन सादर केलेले आहे.

**३) नंदा म्हात्रे, पर्यावरणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ती, माजी उपसरंपच, कणेगाव, तालुका पेण, जिल्हा-रायगडः-**

मी आणि येथील सर्व ग्रामस्थ असे समजतो की कंपनीने सादर केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा क्रॉस पडताळणी (cross verify) करुनच ही जन सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. ही जन सुनावणी जेएसडब्ल्यू प्रकल्पाच्या एकात्मिक स्टील प्रकल्पाची क्षमता १०.० दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन १५.० दशलक्ष टन प्रतिवर्ष विस्तार

करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. माझे लेखी निवेदन पुराव्यासकट सादर केलेले आहे.

माझ्या माहितीप्रमाणे प्रकल्पास १०.० दशलक्ष टन प्रतिवर्ष परवानगी देताना शून्य द्रव निःस्सारण (ZLD-Zero Liquid Discharge) अट पाळण्याचे निर्देश देण्यात आलेले होते. मात्र ही जन सुनावणी सुरु होण्याच्याआधी पाच मिनिटे अगोदर कासूमाता मंदिर जे प्रकल्पासून फक्त पाच मिनिटे अंतरावर आहे, तेथे पाहणी केली असता असे आढळले की प्रकल्पातील अत्यंत प्रदूषित असलेले पाणी धरमतर खाडीत सोडले जाते. मी त्याचा व्हिडिओसुध्दा काढलेला आहे. माझी सर्वांना वस्तूस्थिती सांगायची आहे. माझी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती आहे की कृपया व्हिडिओ तपासून पाहावा. साधारण सहा नाले आहेत. धरमतर खाडीपासून फक्त ५० मीटरवर सांडपाणी हे सोडण्यात येत आहे. मात्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने झिरो लिक्विड डिस्चार्जची परवानगी कशी दिली? माझा ही पहिली हरकत आहे.

पर्यावरण मुल्यांकन अहवालामध्ये झिरो लिक्विड डिस्चार्जची प्रक्रिया ही दाखविलेलीच नाही.

माझी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती आहे की जर ही जन सुनावणी प्रकल्प सल्लागार यांनी सांगितल्याप्रमाणे ईआयए अहवाल याची क्रॉस तपासणी करुन घेतली असते तर बरे झाले असते. कारण कंपनीने कंत्राट दिलेल्या पर्यावरण सल्लागार संस्थेने ही अहवाल तयार केलेला आहे. इंग्रजीत हा अहवाल ३,५०० पानांचा आहे. जल, हवा, माती यांचे काय मापदंड आहेत, ते आम्हाला माहित नाही. मला फक्त बारा पाने मराठीत ईआयए अहवालाची मिळाली. झिरो लिक्विड डिस्चार्ज मापदंड असतानाही कंपनी सांडपाणी धरमतर खाडीत सोडण्यात येते. तर विस्तारीकरण केल्यानंतर आमच्या येथील जलस्त्रोताची काय स्थिती

होईल? मी स्वतः बाटलीत भरुन सांडपाणी आणलेले आहे. त्याचे पृथ्थकरण करण्यात यावे. त्यात विविध प्रकारचे केमिकल्स दिसतील.

पर्यावरण मुल्यांकन अहवालात एक मुद्दा कंपनीने असा सांगितला आहे की अंबा नदीची उपखाडी प्रकल्पाच्या जागेतून येते. खाडी ही पहिल्यापासूनच होती, नंतर प्रकल्प स्थापन झालेला आहे. मी प्रत्येक पॅरानुसार माझी हरकत सादर केलेली आहे. तरी आपण हा ईआयए तपासला असेल, तरच ही जन सुनावणी घ्या. तसेच सदरहू पर्यावरणविषयक जन सुनावणी ही प्रकल्पास पाठिंबा देण्यासाठीच आहे वा प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालावरिल चर्चेसाठी आहे? कारण ही बैठक ही संभम्र निर्माण करणारी आहे.

कारण आम्हांला, स्थानिक जनतेस प्रकल्पाचा पर्यावरण मुल्यांकन अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सत्यापित करणे (verify) अपेक्षित होते. जर कंपनीचा पर्यावरण मुल्यांकन अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सत्यापित (verify) केलेला असेल, तरच ही पर्यावरणविषयक जन सुनावणी ही अधिकृत समजण्यात यावी. नसल्यास ही जन सुनावणी ही बेकायदेशीर आहे असे मी माझे मत नोंदवित आहे.

**४)श्री योगेश काशीनाथ पाटील, ग्रामपंचायत सदस्य, वडखळ, तालुका-पेण, जिल्हा-रायगडः-**

आज आमच्या वडखळ परिसरात ऐतिहासिक दिवस आहे. आम्ही सर्वजण या प्रकल्प विस्तारीकरणास पाठिंबा देत आहोत. प्रकल्प विस्तारीकरणामुळे प्रकल्पात नविन रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे येथील विकासास चालना मिळणार आहे. म्हणून आम्ही प्रकल्प विस्तारीकरणास पाठिंबा देत आहोत.

वडखळ ग्रामपंचायतीने प्रकल्प विस्तारीकरणास पाठिंबा जाहीर केलेला आहे, याचे कारण आहे १९९३ साली या प्रकल्पाची स्थापना झाली. त्यावेळी वडखळ नाक्यावर झालेले

व्यापारीकरण व आता २०२५ साली वडखळमध्ये वाढलेली लोकसंख्या व व्यापार, उद्योग हा जे.एस.डब्ल्यू प्रकल्पामुळेच आहे.

आम्ही खाडीलगतच राहतो. आणि खाडीमधूनच आजही मोठ्या प्रमाणात मच्छी प्राप्त होत आहे. या धरमतर खाडीच्या मच्चिमारांचा विचार करुनच कंपनी प्रशासनाने हे प्रकल्प विस्तारीकरण योजिलेले आहे. मी या पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणीत सांगू इच्छितो की येथील मच्छीमारांसाठी जे.एस.ड्ब्लु प्रकल्पाने वेगळी बाजारपेठ बांधलेली आहे. मी या पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणीत सांगू इच्छितो की येथील मच्छीमारांसाठी जे.एस.डब्ल्यू प्रकल्पाने वेगळी बाजारपेठ बांधलेली आहे.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी सूचना केली की आपण आपले मुद्दे मांडावेत. कंपनी कंपनीचे मुद्दे मांडेल. प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात.

**श्री योगेश पाटील यांनी सूचना केली की –**

अ) विस्तारित प्रकल्पात स्थानिक युवक युवतींना प्राधान्याने रोजगाराची संधी देण्यात यावी,

ब) प्रकल्पात जे कुशल व अकुशल कंत्राटी कामगार काम करत आहेत, त्यांची सुरक्षितता व कल्याणकारी योजनांसाठी हमी मिळावी,

क) पर्यावरण संरक्षणाबाबत असे म्हणणे आहे की ज्या पध्दतीने प्रकल्प प्रवर्तकांनी सुळेवाडी व मालडुंग येथे वृक्षारोपण केलेले आहे, त्यापेक्षा जास्त वृक्षारोपण/हरितपट्टा विकसित करण्यात यावा,

ड) ग्रामीण शैक्षणिक विकास माध्यमातून या परिसरातील विद्यार्थी आय.टी.आय/डिप्लोमा धारक आहेत. तर माझी विनंती आहे की येथे एक मेडिकल कॉलेज व नर्सिंग कॉलेज असावे.

इ) या मातीतला खेळ कबड्डी आहे. तर कबड्डी खेळासाठी एक अकादमी असावी,

ई) प्रकल्प विस्तारीकरण होत आहे. त्याचबरोबर येथील स्थानिकांना आवश्यक असणा-या गरजा पूर्ण करण्यात याव्यात. शेतक-यांच्या जमिनीस योग्य भाव मिळावा,

उ) आमच्या ज्या भूसंपादित भाडेपट्टी जमिनी आहेत, त्या जमिनधारकांना योग्य भाव देण्यात यावा,

ऊ) आमच्या ज्या भूसंपादित भाडेपट्टी जमिनी आहेत, त्या जमिनधारकांना योग्य भाव देण्यात यावा,

स्थानिक युवक-युवतींना केंद्र सरकार व राज्य शासनाच्या स्पर्धा परिक्षांसाठी अभ्यासकेंद्र जे.एस.डब्ल्यू फाऊन्डेशनच्या माध्यमातून त्वरित स्थापन करण्यात यावे. त्यामुळे येथील युवक-युवती युपीएससी व एमपीएससी साठी तयार होतील.

ओ) आय.टी.आय, दहावी व बारावीच्या विद्यार्थी व विध्यार्थीनीसाठी पुढील मार्गदर्शन शिबिर वेळोवेळी आयोजित करण्यात यावे.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी वेळेचे बंधन पाळून दुस-यांना बोलण्याची संधी देण्याची सूचना केली. येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी वेळेचे बंधन पाळून दुस-यांना बोलण्याची संधी देण्याची सूचना केली. आपले लेखी निवेदन प्राप्त आहे.

**५) श्री जीवन पाटील, राहणार-कुसुंबळे गाव, तालुका अलिबाग,जिल्हा-रायगड:-**

आज जे.एस.डब्ल्यू कंपनीचे आभार मानतो. कारण आज जे.एस.डब्ल्यू प्रकल्प नसता तर काय झाले असते? या परिसरात जी बेरोजगारी होती, ती भयंकर स्वरुपात वाढली असती. या प्रकल्पाची जी मूळ जमीन होती, त्या मूळ मालकाच्या कुटुंबातील एकरी एक सदस्यास रोजगाराची संधी कंपनीत देण्यात आलेली आहे. या कंपनीच्या मालकांचे आभार व्यक्त करतो की त्यांनी येथील स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली. तरी या प्रकल्प विस्तारीकरणास माझा पाठिंबा आहे. त्यांनी उपस्थितांना पाठिंबा आहे का याबाबत विचारणा केली असता बहुसंख्येने हात वर करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की कंपनीने काय केले ते अहवालात आहे. वेळेचे बंधन पाळण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्यात यावेत. भाषण करत बसू नये. तसेच ज्यांना लेखी निवेदने सादर करावयाची असतील, त्यांनी ती सादर करावी, त्याची पोच देण्यात येईल.

श्री जीवन पाटील यांनी सूचना केली की कंपनीने बांध बंधिस्ती (Bunding) केलेले आहेत. तरी माझी अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे, श्रीगाव गावांतर्फे मागणी आहे की आमची नापीक जमीन गवळीकोटा, मेढेकरखाडी इ. गावातील बांध बंधिस्ती (Bunding) कंपनीने करावी.

मी कंपनीस मागणी करतो येतील बेरोजगारी नष्ट झाली पाहिजे, स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे, परिसरात झाडे लाऊन प्रदूषण कसे कमी होईल, याकडे लक्ष देण्यात यावे. ज्याप्रमाणे पेण तालुक्यातील प्रत्येक गावात कंपनीने कायापालट केला, तसाच अलिबाग तालुक्यातील गावांमध्ये करण्यात यावा. पेण तालुक्याप्रमाणेच अलिबाग तालुक्यातही विकासकामे करण्यात यावीत. ज्याप्रमाणे पेण तालुक्यात आय.टी.आय, कौशल्यविकास प्रकल्प राबविता, त्याचप्रमाणे तो अलिबाग तालुक्यातही राबवावा. जे अकुशल कामगार आहेत, त्यांना कौशल्यविकास प्रशिक्षण देण्यात येऊन कुशल करण्यात यावे.

या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास माझ्या अलिबाग तालुका शिवसेना शेतकरी संघटनेतर्फे जाहीर पाठिंबा आहे.

**६) श्री चैतन्य उषा लक्ष्मण पाटील, राहणार-पाटणी गाव, पोस्ट-कासू, तालुका-पेण, जिल्हा-रायगडः-**

जो रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून प्रसिध्द आहे, त्या भाताच्या कोठारात कंपनी उत्पादनामुळे उत्पन्न होणार स्लॅग किती आहे? जर १०.० दशलक्ष टन प्रतिवर्ष उत्पादन असताना मोठ्या प्रमाणात स्लॅग सुपीक शेतात टाकला गेलेला आहे, तर १५.० दशलक्ष टन प्रतिवर्ष अजून किती मोठ्या प्रमाणात स्लॅग आपल्या परिसरात, शेतात टाकला जाईल? हे शेतकरी खातील काय? स्टील खातील का? मात्र कंपनीच्या माध्यमातून एक चांगले काम झालेले आहे, ते म्हणजे पाईपलाईनचे काम. पाटणसई ते डोलवी पर्यत, वडखळपर्यत पाईपलाईनचे काम करण्यात आलेले आहे. कंपनीने सांगितलेले होते की त्या पाईपलाईनला सेन्ट्रलाईज फिल्ट्रेशनव्दारे मोफत पाणी देऊ. आजही आमच्या कासू गावातील लोक हे शुध्द पाण्यापासून वंचित आहेत. कित्येक लोकांना जलजन्य रोग, कावीळसारखे रोग होत आहेत. जर एवढी मोठी कंपनी असूनही ती करत नाही. येथील प्रांत अधिकारी यांनीसुध्दा याबाबत आदेश दिलेले होते या गावांना शुध्द फिल्टरड पाण्याचा पुरवठा मोफत करण्यात यावा. २००० सालाच्या जनगणनेनुसार ३६,००० लोक व आता ५०,००० लोकांना हे अशुध्द पाणी प्यावे लागत आहे. जर कंपनी एवढे मोठे काम करते, तर येथे शुध्द पाण्याचा पुरवठा का केला नाही?

आता प्रकल्पात जो स्लॅग उत्पन्न होतो, तो शेतात टाकून शेती नापीक केली जाते. पावसाळ्यात स्लॅगचे पाणी हे दुस-या शेतात जाते, त्यामुळे शेजारील सर्व शेती ही नापीक होते हा कृषि अधिका-यांचाच अहवाल आहे. मा. तालुका कृषि अधिकारी यांनी स्वतः पाहणी करुन हा अहवाल दिलेला आहे. येथे सगळी भाताची रोप करपतात. या अहवालासोबत बराच पत्रव्यवहार शासनाकडे केलेला आहे.

विस्तारीकरण प्रकल्पात ३,००० लोकांना रोजगाराची संधी देणार असे सांगण्यात येते. पण आतापर्यंत किती स्थानिकांना कायमपणे नोकरीत सामावून घेतले या प्रश्नाला उत्तर द्यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की ही जन सुनावणी पर्यावरणविषयक असल्याने फक्त प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयकच सूचना, आक्षेप हे उपस्थित करण्यात यावेत.

**७) श्री परशुराम म्हात्रे, सरपंच, डोलवी ग्रामपंचायत, तालुका पेण, जिल्हा-रायगडः-**

आज पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी ही जे.एस.डब्ल्यू च्या विस्तारीकरण प्रकल्पासाठी आहे. आमची दिशाभूल करण्यात येत होती की येथे कोक ओव्हन प्रकल्प येणार आहे, कोक ओव्हन प्रकल्पाची क्षमता वाढत आहे. मात्र कंपनीने स्पष्टीकरण दिले की कोक ओव्हन प्रकल्पाची क्षमता वाढणार नाही. सादरीकरणात दर्शविण्यात आलेले आहे की विस्तारीकरण प्रकल्पात ३,००० व्यक्तींना रोजगाराची संधी मिळणार आहे. तर आपण येथे स्थानिकांची जी व्याख्या करतो, ती बदलायला पाहिजे. प्रकल्पग्रस्त जी ४-५ गावे आहेत, त्या ग्रामस्थांना रोजगाराची संधी देताना प्राधान्य दिले पाहिजे. मी प्रस्तावित विस्तारीकरणास पाठिंबा देत आहे. तसेच प्रकल्पाच्या संजिवनी हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार मिळाले पाहिजे.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना फक्त पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. त्यांनी पाठिंब्याबाबत पुन्हा न बोलण्याची सूचना केली.

**८) श्री सदानंद ठाकूर, खारढोंबी गाव, तालुका पेण, जिल्हा-रायगड, माजी सैनिक, दोनवेळा विशिष्ट पदक, मेडिकल आणि गुप्तचर संस्थाः-**

जे.एस.डब्ल्यू च्या अगोदर रिफायनरी होती. त्यांच्या पॉवर प्रकल्पापासून मी आठव्यांदा जन सुनावणीत बोलत आहे. माझा पहिला आक्षेप आहे की जो ईआयए अहवाल प्रकल्प

प्रवर्तकांकडून सादर करण्यात आलेला आहे, तर जे.एस.डब्ल्यू च्या पूर्वेला डोंगर आहे. तर डोंगराची उंची का नमुद करण्यात आलेली नाही? कंपनीतून निघणारी मेटॅलिक डस्ट, कार्बन गावातील आमच्या घरांवर पडतो. आमचे बागबगिचे उध्वस्त झालेले आहेत. आमच्या सर्व आंबा बागा उध्वस्त झालेल्या आहेत. आजपर्यंत जी आमची फसवणूक केलेली आहे, तर आम्ही तुमचा निषेध करतो.

बैठकीत आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे की झिरो लिक्विड डिस्चार्जच्या नांवाखाली फेज-१ व फेज-२ येथील सांडपाणी अंबा नदीत सोडण्यात येते. येथे प्रकल्प प्रवर्तक किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी सांडपाणी केंव्हा सोडता व सोडणार आहेत, त्याची टाईम लाईन सांगण्यात यावी.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी उपस्थितांना परत सांगितले की आपण फक्त पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप उपस्थित करावे. त्यांची नोंद घेऊन ते बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येऊन ते शासनास सादर करण्यात येणार आहे.

श्री सदानंद ठाकूर यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प प्रवर्तकांनी झेडएलडीच्या नावाखाली संपुर्ण अंबा नदी ही उध्वस्त केलेली आहे. ही अंबा नदी आमच्या अलिबागकरांची, पेणकरांची गंगा आहे. गेले शेकडो वर्षे अंबा नदीवर मासेमारी करणारे कोळी, तसेच मत्स्य विक्रेते पिढ्यानपिढ्या उपजिविका करत आहेत. त्यांनी अंबा नदी उध्वस्त करुनही प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाचे विस्तारीकरण करायचे आहे. माझा येथे आक्षेप आहे. जोपर्यंत परिस्थिती सुधारत नाही, तोपर्यंत प्रकल्प प्रवर्तकांना कुठलीही परवानगी देण्यात येऊ नये.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणि समिती यांनी वेळेची मर्यादा पाळण्याची सूचना केली, त्यांनी उपस्थितांना फक्त मुद्देसुद सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्प प्रवर्तकांकडून स्लॅगचे जे अनधिकृत भराव करण्यात येतात, त्यामुळे लोक त्रस्त आहेत. आणि मा. जिल्हाधिकारी, रायगड यांनी २४-०९-२०१८ ला आदेश दिलेले आहेत की शेतक-यां नी जरी भराव मागितला, तरी भराव करु नये. तर हे अनधिकृत भराव होतात कसे? याचे उत्तर कंपनीने द्यावे, अन्यथा, त्यांना कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात येऊ नये.

**९) श्री विजय चांगदेव पाटील, राहणार-गडाब, खरचीर्बी गाव, तालुका पेण, जिल्हा-रायगडः-**

मी एक शेतकरी आहे. ८-९ वर्षे माझी शेती नापीक होती. समुद्राच्या पाण्याने शेती घाण झालेली होती. दहा वर्षे शेती खराब असताना कुठलाही प्रतिनिधी माझ्याकडे आला नाही. जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने व प्रकल्प प्रवर्तकांच्या मान्यतेने सीएसआर निधीतून ५-७ लाखांचे काम शेतीच्या बांधावर झाले, म्हणून माझी शेती वाचली. फक्त माझी शेतीच नाही, तर सर्व शेतकरी बांधवांना, बी-बियाणे, खते यांचा सर्व पुरवठा हा कंपनीच्या सीएसआर निधीच्या माध्यमातून झालेला आहे. शेतक-यांना उत्तम पीक कसे घ्यावे, यावर मार्गदर्शन केले जाते. माझा या प्रकल्पास पाठिंबा आहे.

**१०) श्री दिलीप मधुकर म्हात्रे, राहणार-काळेश्री गाव,तालुका-पेण, जिल्हा-पुणेः-**

जे.एस.डब्ल्यू कारखान्यामुळे आमच्या गावात रोजगार निर्मिती होत आहे. प्रकल्पात येणा-या कामगारांमुळे येथील ब-याच घरांमध्ये भाडेकरु राहत असल्याने स्थानिक घरमालकांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध झालेले आहे.

**११) श्री मारुती म्हात्रे, राहणार-वडखळ गाव, तालुका-पेण,जिल्हा-रायगड, तंटामुक्ती अध्यक्षः-**

१९९० साली ही कंपनी आली. येथील अनेक बेरोजगारांना नोक-या मिळाल्या. व्यवसाय वाढले. कंपनीचा विस्तारीकरण प्रस्ताव आम्हांला मान्य आहे.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी पर्यावरणीय आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. अध्यक्ष यांनी उपस्थितांना माहिती दिली की अजून दोन कार्यालयीन दिवसात म्हणजे दिनांक २५ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट, २०२५ कार्यालयीन वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयनात लेखी सूचना, आक्षेप नोंदवू शकता.

**१२) श्री संजय जनार्दन जांभळे, राहणार-डोलवी गाव,तालुका-पेण, जिल्हा-रायगडः-**

२०१४ ला ज्यावेळी जन सुनावणी झाली, तेव्हा मी या कंपनीच्या आमिषाला बळी पडलो आणि त्यावेळेस आम्ही प्रामाणिकपणे पाठिंबा दिला. नंतर आमच्या लक्षात आले की येथे सर्व कंत्राटदार आहेत.

२०१४ ला मी सांगितले की हा प्रकल्प येथे येणे गरजेचे आहे. त्यावेळी त्यांनी आम्हांला काही अटी टाकल्या, त्याच अटी आता टाकलेल्या आहेत. प्रकल्पामुळे प्रदूषण होत आहे. जल, हवा व माती याचे संतुलन बिघडलेले आहे. मी माझ्या डोलवी गावात जातो, प्रकल्पामुळे डोलवी गावात एवढा वास येत असतो, त्यामुळे दमा, कॅन्सर सारखे रोगांचे प्रमाण वाढलेले आहे. २०२४ चा मृत्यूदर जर बघितला, तर महिन्याला चार लोक प्रत्येक गावात वारतात. आज डोलवी गावात तीन महिन्यात जवळजवळ २५ लोक वारली. गावात कॅन्सरचे प्रमाण वाढलेले आहे. आमच्या गावात कॅन्सरग्रस्त लोक आहेत.

येथील कोळवे गावाची लोक संजीवनी ह़ॉस्पिटलला डायलेसिससाठी गेली, तर त्यांना अलिबागला जायला सांगतात. मात्र त्यांच्या अधिका-यानेच लिहून दिलेले होते की संजिवनीमध्येच डायलिसिस करा. पैशासाठी स्थानिक आजारी माणसाला त्रास का देता?

येथे आम्हांला फक्त प्रदूषणावरच बोलायचे आहे. विस्तारीकरण प्रकल्पास विरोध नाही, पण या कंपनीचा स्थानिक लोकांना, स्थानिक कंत्राटदारांना प्रदूषणाचा, कंपनीचा

खूपच त्रास होतो. येथे प्रदूषण वाढलेले आहेत. येथे युरिक एसिडचे प्रमाण वाढलेले आहे. जोपर्यंत फेज-२ मुळे जे प्रदूषण होत आहे, ते प्रथम थांबवा, नंतरच परत जन सुनावणी आयोजित करुन या प्रकल्पाचा विचार करण्यात यावा.

**१३) श्री संजय चवरकर,राहणार-मौजे गडब गाव, तालुका पेण, जिल्हा-रायगड:-**

शुध्द हवा हा मानवाचा मूलभूत अधिकार आहे असे आतंरराष्टीय न्यायालयाने निर्वाळा दिलेला आहे. तरी येथील स्थानिकांना शुध्द हवा हवी आहे. फक्त आम्हा स्थानिकांनाच नको, तर कंपनीत काम करणा-या कामगारांनाही शुध्द हवेची गरज आहे.

तर कंपनीच्या फेज-१ व फेज-२ मुळे स्थानिक हवेची पातळी खराब केलेली आहे, गडबपासून पेणपर्यंत जाताना जो हवेचा वास येतो, तो असह्य असतो. डांबरासारखा, शेण जळल्यासारखा वास येतो. परिसरातील लहान मुले, वृध्द यामुळे आजाराने जर्जर झालेली आहेत. म्हणजे येथील २०% लोकांच्या फायद्यासाठी ८०% लोकांवर दुषित हवेचा मारा करत आहात. आमचा विकासाला विरोध नाही. पण विकास करताना आरोग्याच्या समस्या वाढू नये, कोणालाही त्या विकासाचा त्रास होऊ नये. यांचा गांभार्याने विचार करुन प्रकल्पाचा ईआयए अहवालात पुन्हा सुधारणा करुन त्याचे मराठी भाषांतर करुन परत जन सुनावणी घेण्यात यावी मग नंतरच फेज-३ चा विचार करण्यात यावा असे माझे मत आहे.

**१४)श्री राजेश भिकाजी मोकल, सरपंच, वडखळ ग्रामपंचायत, तालुका-पेण,जिल्हा-रायगड:-**

प्रकल्पाचे फेज-३ चे सादरीकरण दर्शविलेले आहे. २००६ च्या नियमानुसार जर फेज-२ व फेज-३ ला परवानगी दिलेली असेल तर त्याच नियमांच्या अधिन राहून परवानगी द्यावी. परवानगी देताना कंपनीचे काही दायित्व आहे, ते कंपनीने पाळले पाहिजे. उदा- पाणी. तर

कंपनीने आमच्या वडखळ गावाला चोवीस तास पाणी द्यावे. हॉस्पिटलला चांगले डॉक्टर द्यावेत, स्थानिक लोकांना मोफत उपचार द्यावेत. सीएसआर निधीचा वापर स्थानिक सामाजिक कार्यासाठी करा. आमचा सर्व ग्रामस्थांचा विस्तारीकरण प्रकल्पास पाठिंबा आहे.

**१५) श्री अभिमन्यू यशवंत म्हात्रे, राहणार-भाल गाव, तालुका पेण, जिल्हा-रायगडः-**

एक मुद्दा मांडत आहे, हा मुद्दा शासनाने दिलेला आहे. कार्यकारी अभियंता, खारभुमी सर्वेक्षण अन्वये विभाग पेण यांच्यातर्फे १९-०६-२०२३ ला दिलेला मुद्दा आहे. देशाच्या प्रगतीला माझा अजिबातच विरोध नाही. मात्र , खारभुमी सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार जेएसडब्ल्यू प्रकल्पाच्या ज्या मोठ्या बार्जेस आहेत, त्या अंबा नदीतून धरमतर जेट्टीत येतात. त्या येण्यासाठी २०-२५ फूट नदीतील गाळ काढलेला आहे. तेथील नैसर्गिक खडक बंधिस्ती टिकण्यासाठी असतो, तो नैसर्गिक खडकच फोडलेला आहे. २०-२५ फूट खोली वाढविल्याने आमची शेती विठ्ठलवाडी गाव, लाखोले इ. गावांतील शेती ही पूर्णपणे नादुरुस्त झालेली आहे. या खारभूमीसाठी जवळजवळ शंभर कोटींची निधी आलेला होता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी फक्त पर्यावरणीय मुद्दे उपस्थित करण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे ज्यांना अजून सूचना, आक्षेप नोंदवावयाचे आहेत, त्यांनी लेखी स्वरुपात अजून दोन कार्यालयीन दिवसात म्हणजे दिनांक २५ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट, २०२५ कार्यालयीन वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात किंवा वैयक्तिक त्यांच्याकडे लेखी सूचना, आक्षेप नोंदवू शकता असे सांगितले.

श्री अभिमन्यू म्हात्रे यांनी आक्षेप नोंदविला की खा-या पाण्यामुळे आमची जमीन नापीक झालेली असून तेथे काहीही पिकत नाही. तरी या मुद्द्यांची नोंद घेण्यात यावी.

त्यावेळी एक उपस्थितांनी एक कॅन्सरबाधित व्यक्तीस बोलून देण्याची विनंती केली. त्यावेळी अध्यक्ष यांनी संबंधित व्यक्तीस लेखी निवेदनावर स्वतः पोच देत असून लेखी निवेदन सादर करण्यास सांगितले.

**१६) श्री मंगेश भगत, राहणार-शहाबाज, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी लेखी निवेदन सादर केले.

**१७)सौ. अश्विनी ठाकूर, राहणार-फणसडोंगरी, तालुका-पेण,जिल्हा-रायगडः-**

येथील काहीजण कंपनीच्या प्रदूषणाचा उगीचच मुद्दा उपस्थित करत आहे. मुंबईत एवढे कारखाने आहेत, तेथे प्रदूषण नाही का?

**१८) ॲड. तन्मय हरिश्चंद्र पाटील, राहणार-पेण, जिल्हा-रायगडः-**

त्यावेळी ॲड. तन्मय हरिश्चंद्र पाटील, राहणार-पेण यांनी आक्षेप नोंदविला की आमची वडिलोपार्जित जमिन हिसकावून घेतलेली आहे. कुटुंबातील एका माणसालाच नोकरी देण्यात आली.

मा. अध्यक्ष, यांनी उपस्थितांना संक्षिप्त स्वरुपात पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. मात्र काही स्थानिक पर्यावरण विषयांशिवाय इतर विषयांवरच एकत्रित बोलत होते.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना आवाहन केले की ज्यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक लेखी सूचना, विचार वा आक्षेप नोंदवायच्या आहेत, त्यांनी त्या लेखी स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या कार्यालयात सोमवार दिनांक २५-०८-२०२५ ते २६-०८-२०२५ पर्यत सादर कराव्यात. बैठकीच्या इतिवृतांतासोबत

त्या शासनास सादर करण्यात येतील. त्यांनी सर्वांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

प्राप्त झालेले एकूण १२,३६३ पाठिंबा/सूचना याबाबत आणि ३९४ आक्षेप याबाबत पत्रे सोबत जोडलेली आहेत. तसेच, प्रकल्प प्रवर्तक यांनी जाहीर जन सुनावणीत (विस्तारिकरण) विचारण्यात आलेल्या प्रश्नांना अनुसरून त्यांचा खुलासा व प्रस्तावित प्रकल्पाबाबत संक्षिप्त माहिती ही म. प्र. नि. मंडळास सादर केलेली असून त्याची प्रत या इतिवृत्तासोबत संलग्न करण्यात आलेली आहे.

08/09/2025

**(ऋतुजा भालेराव )**
आयोजिका,
पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
रायगड-२,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड,
रायगड भवन, नवी मुंबई

**(संजय भोसले)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड,
रायगड भवन, नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहीर जन सुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग,
जिल्हा – रायगड